अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ

आणि

महाराष्ट्र साहित्य परिषद, महाबळेश्वर

आयोजित

# ८२वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन

## दिनांक : २०, २१, २२ मार्च २००९

## महाबळेश्वर

संमेलन अध्यक्षीय भाषण

# डॉ. आनंद यादव



संयोजक

महाराष्ट्र साहित्य परिषद

शाखा, महाबळेश्वर

चौफेर

आदरणीय साहित्यप्रेमी बंधुभगिनींनो,

महाबळेश्वरसारख्या निसर्ग-समृद्ध रम्य आणि सुंदर नगरीत होत असलेल्या ८२व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी माझी जी बहुमतांनी निवड झाली, तो मी आजवर केलेल्या साहित्यशारदा देवीच्या सेवेचा कृपाप्रसाद समजतो. आपल्या सर्वांच्या उपस्थितीची मधुर साखर त्यात मिसळल्याने मला त्याचा अधिक आनंद झालेला आहे. विशेषत: आपले हे साहित्य-संमेलन शेकडो रसिक-वाचक, कवी, लेखक, समीक्षक, उपासक यांनी मंडित झालेले मला दिसते आहे.

गेली पन्नासएक वर्षे मी सरस्वतीमातेची मनोभावे उपासना आणि आराधना केली, तिच्यात मला उत्कट आनंद तर मिळत होताच; पण प्रसिद्धी आणि काहीशी प्रतिष्ठाही मिळत होती. त्या उत्कट आनंदाला या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदामुळे कांती प्राप्त झाली आहे, असे मला वाटते.

आपल्यासारख्या जाणकारांच्या समोर मी काही मार्गदर्शक विचार मांडावेत, अशी माझी योग्यता नाही. कारण मी काही विद्वान, विचारवंत, मार्गदर्शक वगैरे नाही.

रसिक मित्रहो, मी प्रामुख्याने ललित लेखक आहे. वयाच्या १०व्या वर्षापासून वाचनाचा छंद मला लागला. ११-१२व्या वर्षी शब्दाला शब्द जुळवण्याचा नाद लागला. त्यातूनच ग्रामीण कविता लिहू लागलो. २५-२६व्या वर्षी एम.ए. होऊन नोकरी लागल्यावर कथा लिहू लागलो. हळूहळू प्रौढ वयात प्रामुख्याने गद्य लेखनाकडे वळलो. विविध साहित्य प्रकारांचा अभ्यास करू लागलो आणि कालौघात कादंबरी, ललित लेख, नाटिका, नाटक, क्वचित परीक्षणे आणि नंतर वाङ्मयविषयक वैचारिक लेख व ग्रंथही लिहू लागलो. वैचारिक लेखनाला शिस्त लागावी म्हणून पीएच.डी. झालो. आजवर माझ्या साहित्यकृतींना चाळीस लहानमोठे पुरस्कार मिळाले आहेत. त्यात भारत सरकारचा साहित्य अकादमी, मध्य प्रदेश सरकारचा प्रियदर्शनी, लाभशेठवार इत्यादी महत्त्वाचे पुरस्कार आहेत.

मी सामाजिक जाणिवेने प्रभावित होऊन ग्रामीण साहित्याची चळवळ ग्रामीण विभागात उभी केली आणि दहाबारा वर्षे यशस्वीपणे चालविली. आज तिची फलनिष्पत्ती ग्रामीण समाजातील तरुण ग्रामीण लेखकांच्या लेखनातून दिसते आहे. ग्रामीण विभागातून आज पुरेसे ग्रामीण साहित्य लिहिले जात आहे, याचा मला आनंद होतो.

माझा जन्म १९३५ साली कागलसारख्या त्या वेळच्या खेड्यात झाला. १९४०-४२ साली कागलची लोकसंख्या साडेचार हजार होती. प्रामुख्याने तिथे शेती व्यवसाय चालत असे. कागलच्या दक्षिणेस दूधगंगा नदी पूर्व पश्चिम दिशेने वाहते. या नदीच्या पलीकडच्या काठापासूनच कर्नाटकची सरहद्द सुरू होते. त्यामुळे कर्नाटक राज्यात गेलेल्या अनेक मराठी खेड्यांचा व गावांचा परिचय व संबंध कागल गावाशी घनिष्टपणे पूर्वीपासूनच होता.

या पार्श्वभूमीवर मी आज आपल्यापुढे माझे काही सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्यविषयक विचार मांडणार आहे.

( १ ) मराठी माणसाच्या मनाला सदैव डाचणारा आणि अस्वस्थ करणारा नेहमीचा एक सामाजिक राजकीय प्रश्न म्हणजे महाराष्ट्र राज्यनिर्मितीच्या वेळी महाराष्ट्रापासून अलग झालेला मराठी भाषिकांचा चिकोडी, निपाणी, संकेश्वर, बेळगाव, कारवारचा मराठी प्रदेश. त्या वेळच्या भाषिक राज्यनिर्मिती करणाऱ्या समितीच्या धोरणाचा हा परिणाम होय. या समितीने सामान्यत: तालुका हा मूल घटक मानून राज्यनिर्मिती केली आहे. त्याची कटू फळे आजही महाराष्ट्राला भोगावी लागत आहेत. कारण तथाकथित नव्याने निर्माण झालेल्या महाराष्ट्र राज्याच्या दक्षिणेकडे असलेल्या कन्नड भाषिक कर्नाटक राज्यात मराठी बोलणारी अनेक खेडी, गावे आणि शहरे गेलेली आहेत. उदाहरणार्थ, चिकोडी, निपाणी, संकेश्वर, बेळगाव, कारवार ही नगरे आणि त्यांच्या भोवतालची अनेक खेडी ही मराठी भाषिकांची आहेत. तालुका हा मूलघटक मानून भाषिक राज्यनिर्मिती केली गेली आहे, त्यामुळे त्याचा तोटा फक्त महाराष्ट्र राज्याला सोसावा लागत आहे आणि फायदा मात्र कर्नाटक राज्याला झालेला आहे.

मराठी भाषिकांचा आत्ताच उद्धृत केलेला कर्नाटक राज्यातील भाग महाराष्ट्राला परत मिळावा, यासाठी तेथील आणि महाराष्ट्रातील मराठी भाषिक जनतेने खूप वेळा आणि दीर्घ काल आंदोलने यापूर्वी केलेली आहेत. पण अजून तरी त्यांचा काहीही परिणाम झालेला नाही.

उलट कर्नाटक राज्यातील या मराठी भाषिकांवर प्रचंड अन्याय होतो आहे. त्या ठिकाणी मराठी भाषा शिक्षण व्यवस्थेतून काढून टाकण्यात आलेली आहे आणि कानडी भाषेतून सक्तीचे शिक्षण सुरू केले आहे. असहाय झालेला मराठी भाषिक माणूस नाइलाजाने कानडी भाषा शिकतो आहे. जगण्याचे, चरितार्थाचे, सक्तीचे साधन म्हणून ती भाषा त्याला शिकावी लागत आहे. परिणामी तेथील मराठी भाषा, मराठी संस्कृती आणि मराठी जीवन नष्ट होऊ घातलेली आहेत. मराठी माणसाला तिथे अत्यंत नगण्य अशा गौण स्थानी राहून जगावे लागत आहे. अन्याय सहन करावा लागत आहे. त्याला सरकारी नोकरीत स्थानच मिळू शकत नाही, अशी त्याची दयनीय अवस्था झालेली आहे.

अशा ह्या कर्नाटक राज्यातील मराठी भाषिकांची गावे कर्नाटक राज्यातून मुक्त करून ती महाराष्ट्र राज्याला जोडण्यासाठी महाराष्ट्रातील सर्व सामाजिक संस्था, सर्व राजकीय पक्ष आणि सर्वसामान्य बहुजन मराठी माणसांनी एक गठ्ठा एकत्र येऊन दिल्लीस्थित भारत सरकारला सविस्तर लेखी विनंती करून प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे, तरच कर्नाटकस्थित मराठी मुलखाला योग्य तो न्याय मिळू शकेल असे वाटते.

( २ ) मराठी माणसाने उद्योग, नोकरी, आवड, अभ्यास इत्यादीसाठी शास्त्रीय ग्रंथ, संबंधित अभ्यासाचे ग्रंथ जरूर वाचले पाहिजेत, अभ्यासले पाहिजेत. त्यासाठी आपणांस इंग्रजी भाषेचे ज्ञान उत्तमच असले पाहिजे, यात तीळमात्र शंका नाही. पण ही इंग्रजी भाषा आपल्याबरोबरच आपल्या मुलालाही उत्तम रीतीने येण्यासाठी त्याला कायमचा अगदी माँटेसरी म्हणजे बालवर्गापासूनच मातृभाषेपासून वंचित करून केवळ इंग्रजी भाषा शिकविण्यासाठी इंग्रजी हेच माध्यम असलेल्या शाळांत घालण्याची गरज नाही. त्याला निदान एस.एस.सी.पर्यंत तरी मातृभाषेच्या म्हणजे मराठी हे शिक्षणाचे माध्यम असलेल्या शाळेतच घातले पाहिजे, तरच त्याला मराठी मातृभाषा नीटपणे अवगत होऊ शकेल.

मातृभाषा ही केवळ बोलण्यासाठी वापरण्याची भाषा नसते. ती तुम्हाला तिच्यात अवगुंठित असलेल्या मराठी समाजाची ओळख कळत नकळत करून देत असते. एवढेच नव्हे; तर मराठी संस्कृती, मराठी परंपरा, मराठी मन आणि त्याची मानसिकता, मराठी समाजाचा इतिहास, वारसा, ज्ञान-विज्ञान, मराठी व्यक्तिमत्त्व इत्यादी सर्व काही कळत नकळत सहजपणे देत असते आणि तुमचे मराठी व्यक्तिमत्त्व घडवीत असते.... म्हणून कोणत्याही सुसंस्कृत माणसाने किंवा सुसंस्कृत होऊ पाहणाऱ्या तरुणाने मातृभाषेपासून वंचित होऊन स्वत:ला पोरके करून घेऊ नये, असे वाटते.

हे सर्व आपणास सांगण्याचे कारण की अनेक शहरांतून काही इंग्रजी माध्यमांच्या शाळांतून इयत्ता पहिलीपासूनच केवळ इंग्रजी माध्यमांतूनच शिकविले जाते आणि त्या खर्चीक शाळांत उच्च मध्यमवर्गीय पालक आपल्या बालबच्च्यांना इयत्ता पहिलीपासून घालतात. आपला मुलगा त्या शाळेत घातला असल्याचे अभिमानाने सांगणारे पालक भेटतात.... हे सांगतानासुद्धा मराठी भाषेत अनेक इंग्रजी शब्द पेरत ते बोलत असतात... आपण कसे 'हाय फाय' संस्कृतीतील उच्चभ्रू लोक आहोत, हे दाखविण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. मुलांनी आत्तापासूनच इंग्रजीतून बोलावे, असा त्यांचा अट्टहास असतो. परिणामी या मुलांना धड इंग्रजीही येत नाही आणि धड मराठीही येत नाही. ती मराठीत इंग्रजी शब्द मिसळून धेडगुजरी भाषेत बोलू लागतात.

महाराष्ट्राचे सांस्कृतिक केंद्र असलेल्या शहरांतून आजची तरुण पिढी अशाच प्रकारची भाषा बोलताना दिसते. या पिढीच्या मराठी भाषेत इंग्रजी शब्द अकारण पेरलेले असतात. असे केल्याने आपणही एक उच्च विद्याविभूषित घराण्यातील आहोत, असे त्यांना वाटते. त्यांच्या मनाची ही चुकीची समजूत दूर झाली पाहिजे.

सारांश मराठी माणसाने अत्यावश्यक असलेले उच्च शिक्षण जरूर घेतले पाहिजे. उद्योग, नोकरी, माहिती, आवड, अभ्यास, पदवी इत्यादींसाठी इंग्रजीतील शास्त्रीय ग्रंथ जरूर वाचले पाहिजेत; पण त्यासाठी मातृभाषेपासून पारखे होण्याची गरज नाही. निखळ मराठी मातृभाषा ही लिहिता, वाचता आणि बोलता, अनुभवता आलीच पाहिजे. कारण मातृभाषा ही माउलीच्या दुधासारखी असते. आपल्या बालकाचे पोषण आई जसे आपल्या दुधावर करते आणि सर्वांगांनी वाढवते तेच कार्य मातृभाषा बालकाच्या बौद्धिक, सांस्कृतिक, भावनात्मक शक्ती वाढविण्याच्या बाबतीत करत असते... मातृभाषेचे हे जीवनव्यापी कार्य समाजाने ओळखून तिचे भरण-पोषण केले पाहिजे. तरुण पिढीला ती अभिमानाने शिकविली पाहिजे; तरच मराठी माणूस हा खऱ्या अर्थाने 'मराठी' राहू शकेल.

( ३ ) मित्रहो, देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या गेल्या पन्नाससाठ वर्षांत लोकसंख्या खूपच वाढली. इ.स. १९४२च्या आसपास अखंड हिंदुस्थानची लोकसंख्या तीस-पस्तीस कोटी होती. त्या काळात महात्मा गांधी कोणाचे 'पस्तीस कोटी जनतेचे!' असा जयघोष करत आम्ही बालपणी प्रभातफेऱ्या काढल्याचे आठवते. पारतंत्र्याचा तो काळ होता. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वतंत्र भारताची निर्मिती झाली. छोटी-मोठी राष्ट्रे देशाच्या सीमा भागांवर निर्माण झाली. तरीही आजघडीला स्वतंत्र भारताची लोकसंख्या एकशेदहा कोटींच्याही पुढे गेलेली आहे. त्यामुळे सर्वसामान्य माणसाचे जगण्याचे प्रश्न बिकट होत गेले आहेत.

देश स्वतंत्र झाल्यावर सर्वसामान्य माणसामधील ध्येयवाद कमी झाला. हळूहळू त्याच्या जगण्यात ढिलेपणा आला. भोगवृत्ती, मौजमजा वाढत गेली. 'आदर्श' संपुष्टात आले. ध्येयवादाचे सपाटीकरण झाले. तरीही लोकसंख्या वाढतच होती. तरुण पिढीसमोर हळूहळू नोकऱ्यांचे प्रश्न उभे राहिले. पूर्वीसारख्या त्या झटपट मिळेनाशा झाल्या. हळूहळू बेकारी निर्माण होऊ लागली. ती वाढत गेली. परिणामी अवैध धंदे सुरू झाले. समाज जीवनात लाचलुचपती वाढत गेल्या. गेल्या वीस वर्षांत तरुण पिढीचे जगण्याचे प्रश्न अति बिकट होत गेले. सर्वच पातळ्यांवर मूल्याचा ऱ्हास होत गेला. जीवनादर्श, संस्कृतीची उपासना, मूल्यनिष्ठा, सचोटी इत्यादी मूल्ये नष्ट होऊन स्वार्थी वृत्ती आणि चंगळवाद वाढत गेला. नोकरीची शाश्वती नष्ट होत गेली. भांडवलशाही निरंकुशपणे वाढत गेली.

याचा परिणाम सर्वसामान्य माणसावर झाला. नोकरीच्या क्षेत्रात त्याला शाश्वती मिळेनाशी झाली. त्यातूनच कामगार-संघटना वाढत गेल्या. परिणामी संप-मोर्चेही वाढत गेले. परस्परांविषयीची आस्था-आपुलकी संपुष्टात येऊन विविध सामाजिक स्तरांत विविध प्रकारचे तणाव आणि संघर्ष निर्माण होऊ लागले. एकमेकांविषयीचा विश्वास संपुष्टात येत चालला. जागतिक मंदीचा परिणाम कामगार विश्वावर झाला. अनेकांच्या नोकऱ्या गेल्या. अशा वेळी वैयक्तिक पातळीवर सर्वसामान्य माणसाने फार विचारपूर्वक वागले पाहिजे आणि एकूण जीवनाविषयीचे निर्णय घेतले पाहिजेत. जीवनाविषयीची गतानुगतिकता सोडून त्याची नवी मांडणी केली पाहिजे. या नव्या मांडणीचा एक भाग म्हणून स्वयंरोजगार निर्माण करण्याची गरज आहे. आपल्या भोवतालच्या परिस्थितीचा अभ्यास करून हा स्वयंरोजगार निर्माण करता येणे शक्य असते. सध्याच्या स्पर्धायुगात हा एक बेकारीवरील उपाय होऊ शकतो.

स्वयंरोजगार किंवा स्वतंत्रपणे उद्योग-व्यवसाय निर्माण करून तो चालविणे हे काम काहीसे चिकाटीचे, जिद्दीचे आहे. अशा कामात अडथळे येणे शक्य असते आणि भवितव्यही अंधारात असते; म्हणून असे कष्टाचे उद्योग, व्यवसाय निर्माण करून चालविण्यापेक्षा एखादी उपयुक्ततावादी पदवी मिळवून कुठल्या तरी उद्योगसंस्थेत, कारखान्यात किंवा परदेशी जाऊन नोकरी करणे मध्यमवर्गीय पांढरपेशा तरुणाला सोयीचे वाटते. त्यामुळे तो उपयुक्त पदव्यांचे शिक्षण घेतो, त्यांचे कोर्सेस पुरे करतो आणि परदेशी नोकरीसाठी जाऊन सुखाने राहतो. पण त्यामुळे आपल्या देशाला, संस्कृतीला, कौटुंबिक संबंधांना आणि मराठीपणालाही अंतर्बाह्य मुकतो.

( ४ ) नागर समाजातील पांढरपेशा, मध्यमवर्गीय, सुशिक्षित तरुणाची ही अशी अवस्था झाल्याने उद्याचा नागर मराठी समाज हा केवळ पेन्शनरांचा असेल की काय, अशी काळजी वाटते. नागर समाजाची अशी स्थिती १९९० सालानंतरच्या दशकात विशेषत्वाने जाणवू लागली.

( ५ ) नागर मराठी समाजाने ब्रिटिश अमदानीच्या उत्तरार्धात म्हणजे सामान्यत: १८८० सालाच्या आसपास आधुनिक मराठी साहित्याचा पाया भक्कमपणे घातला आणि त्याचा विकास विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात म्हणजे १९०० ते १९६० पर्यंत झपाट्याने केला. आधुनिक मराठी साहित्य विविध अंगांनी समृद्ध केले. १९६०च्या आसपास या समाजात साहित्याला वाहिलेली ६० ते ७० नियतकालिके निघत होती. या काळातच साहित्याचे प्रकाशन अनेक अंगांनी करणाऱ्या अनेक प्रकाशन संस्थाही जन्माला येत होत्या आणि जोमाने कार्य करीत होत्या. सामान्यत: ही स्थिती १९८०-८५ पर्यंत होती.

तेथून पुढे मात्र नागर मराठी साहित्यात स्थिरता निर्माण झाली. मराठी साहित्यात दहा-दहा वर्षांनी नवी पिढी निर्माण होत होती; ती प्रक्रियाही थांबत गेली. हळूहळू नागर मराठी साहित्याचा विकास आणि विस्तार थांबत गेला.

याचे महत्त्वाचे कारण असे की लोकसंख्या भरपूर वाढत गेली. स्थानिक पातळीवर नोकऱ्या मिळेनाशा झाल्या. त्यामुळे तरुण पिढ्या इंग्रजी माध्यमातून वेगवेगळ्या औद्योगिक आणि उपयुक्ततावादी विषयांचा अभ्यास करून पदव्या मिळवू लागल्या. इंग्रजी ही जागतिक पातळीवरची भाषा आहे. त्यामुळे त्या माध्यमातून पदवी घेतलेल्या तरुणाला जगात कुठेही नोकरी मिळू शकेल. या जाणिवेने नागर समाजातील तरुण पिढी इंग्रजी भाषेच्या माध्यमाकडे अगदी आरंभापासून वळू लागली. स्वाभाविकच त्यांची मातृभाषा असलेल्या मराठीकडे त्यांचे दुर्लक्ष होऊ लागले. परिणामी मराठी भाषा आणि तिच्यातून होणारी सकस साहित्याची निर्मितीही कमी कमी होत गेली. मराठी नागर समाजाच्या सांस्कृतिक जीवनाचा हा विशेष टप्पा होता.

याचा परिणाम मराठी नियतकालिकांवरही झाला. ही नियतकालिके बंद पडत गेली. आज फार थोडी मराठी नियतकालिके कशीबशी तग धरून आहेत. एक व्यवसाय म्हणून दिवाळी अंक मराठीतून (वर्षातून एकदा) निघताना अजून तरी दिसतात.

( ६ ) साहित्यविषयक निर्मितीची संस्कृती जशी कळत-नकळत नागर समाजातून हळूहळू ढासळत चालली आहे; तशी आपली शहरी कुटुंबव्यवस्थाही नकळत ढासळत चालली आहे. कुटुंबव्यवस्था ही सांस्कृतिक समाजव्यवस्थेचा एक महत्त्वाचा घटक असते. त्यामुळे संस्कृती आणि समाजव्यवस्था बदलू लागली की कुटुंबव्यवस्थाही बदलू लागते.

भारतीय समाजव्यवस्था ही वैशिष्ट्यपूर्ण आहे. तिच्यात वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था अजूनही कळत-नकळत टिकून आहे. ती हजारो वर्षे चालत आलेली आहे. देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत ती भक्कमपणे चालू होती. स्वातंत्र्योत्तर काळात तिच्यातील कर्मठपणा, श्रेष्ठकनिष्ठता वाद काही प्रमाणात शिक्षणाच्या प्रभावामुळे कमी होत गेला, तरी वर्ण-जाती पूर्ण नष्ट होऊ शकल्या नाहीत. त्या पूर्णपणे नष्ट होतील असेही वाटत नाही.

मात्र भारतीय समाजव्यवस्थेचे पारंपरिक कौटुंबिक नातेसंबंध जे एकेकाळी दृढ स्वरूपाचे होते; ते मात्र आजच्या शहरी कुटुंब व्यवस्थेतून नष्ट होऊ लागले आहेत. एकेकाळी चुलते, पुतणे, भाऊ भाऊ एकत्र राहून एकमेकांना शिक्षणासाठी मदत करीत असत. सर्व मिळून व्यवसाय, स्वत:चा हक्काचा उद्योगधंदा करत असत. कौटुंबिक सुखदु:खात सर्व मिळून सहभागी होत असत. मोठ्या शहरातून ही संस्कृती नष्ट होऊ लागली आहे; तशीच ती खेड्यापाड्यातूनही शहरी संपर्कामुळे नष्ट होताना दिसते आहे. प्रामुख्याने हा यंत्रयुगाचा परिणाम मानला जातो. भौतिकवादी, भोगवादी वृत्तीचा, संस्कृतीचाही हा परिणाम मानला जातो.

ते काहीही असले तरी शहरातील आणि आजच्या खेड्यांतीलही संयुक्त कुटुंबव्यवस्था बहुअंशी नष्ट होत गेलेली दिसते आणि त्याजागी 'पति-पत्नी आणि मुले' अशी एकेरी, व्यक्तिवादी, व्यक्तिकेंद्रित कुटुंबव्यवस्था निर्माण झालेली दिसते. मुलेही लग्न झाल्यावर पटकन अलग होतात. बाहेरगावच्या नोकऱ्यांचाही हा परिणाम असला तरी व्यक्तिकेंद्रित, आत्मकेंद्रित वृत्तीचा हा प्रभाव मानावा लागतो. यातूनच स्वत:पुरते पाहण्याची, विचार करण्याची, अलग राहण्याची व्यक्तीची वृत्ती वाढत गेली. शहरातील, नगरातील सुशिक्षित वर्गात याचे प्रमाण वाढत गेले. परिणामी

तेथील माणूस एकटा पडत गेला. त्याच्या सुखदु:खांत इतर कोणी सामील होईनासे झाले. त्याच्याही कव्यक्तिकेंद्रित, आत्मकेंद्रित वृत्तीमुळे कुणापाशी आपली सुखदु:खे सांगण्याची त्याची वृत्ती आणि सवय नष्ट झाली. तिचा परिणाम चंगळवाद, भोगवाद निर्माण होण्यात झालेला दिसतो. आजची तरुण पिढी यात जास्त वाहवत गेलेली दिसते.

याचा दुसराही एक परिणाम असा झालेला दिसतो की वयस्क, वृद्ध, पेन्शनर पति-पत्नी आपल्या तरुण मुलाबाळांपासून अलग पडत गेली. एकाकी राहू लागली. नात्यागोत्यांना काही अर्थ राहिनासा झाला. माणूस एकाकी, एकटा, आत्मकेंद्रित आणि मोठ्या प्रमाणात व्यसनी, आत्मनिष्ठ होत गेला... समाजव्यवस्थेचे हे विघटन एकूण भारतीय समाजव्यवस्थेलाच उद्या धोक्यात आणल्यास नवल वाटणार नाही.

( ७ ) शहरी माणसाच्या या एकाकी पडणाऱ्या मनाचा परिणाम साहित्य निर्मितीवर झालेला दिसतो. काही नवकवी, अतिनवकवी, नवकथाकार यांचे साहित्य याच शहरी वस्तुस्थितीतून निर्माण झालेले दिसते. सामाजिक स्थितीचा परिणाम साहित्यावर कसा होतो, त्याचे हे ढळढळीत उदाहरण आहे.

मराठी नवकथा, नवकविता, संज्ञाप्रवाही साहित्य हे यांचाच परिपाक असलेले दिसते. १९८०-८५ नंतरच्या काळात हेही साहित्य कोमेजत जाऊन शहरकेंद्री जीवनावरील नागरसाहित्य व त्याची निर्मिती जवळजवळ नामशेष झाल्यासारखी आज वाटते आहे.

( ८ ) याच्या नेमके उलट महाराष्ट्राच्या ग्रामीण विभागात घडताना दिसते. १९६० साली महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली आणि ग्रामीण मराठी समाजाच्या इतिहासाचे एक नवे पान उलगडले गेले. ते म्हणजे महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री माननीय यशवंतरावजी चव्हाणांनी आपल्या सहकाऱ्यांना महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यांतून नवनव्या शिक्षणसंस्था स्थापण्यास सांगितले. त्याचा परिणाम होऊन खेड्यापाड्यांतून प्राथमिक शाळा, तालुक्याच्या गावी हायस्कूल, जिल्ह्याच्या ठिकाणी किंवा केंद्रस्थानी असलेल्या शहरांतून महाविद्यालये स्थापन करण्यास प्रोत्साहन दिले. याचा हळूहळू परिणाम असा झाला की बहुजन समाजात शिक्षणविषयक जागृती निर्माण झाली आणि शिक्षणाचे प्रमाण वाढले. नवसाक्षर तरुण पिढीला विकसनशील काळ असल्यामुळे नवनव्या नोकऱ्या मिळू लागल्या आणि ग्रामीण समाजाचा कायापालट होऊ लागला.

( ९ ) १९६० पूर्वी ग्रामीण महाराष्ट्राची स्थिती शैक्षणिक दृष्ट्या केविलवाणी होती. शिक्षणाचा प्रसार काहीही झालेला नव्हता. सर्वसाधारण कुणबी समाज गतानुगतिक पद्धतीने शेतावर राबून पोटापुरते धान्य पिकवीत होता. मोलमजुरी करत होता. बलुतेदार मंडळी आपापली बलुत्याची पारंपरिक कामे करीत होती आणि चरितार्थ चालवीत होती.

मात्र या ग्रामीण समाजातील पाटील, वतनदार, इनामदार व ब्राह्मणवर्ग आपल्या आर्थिक बळावर खेड्यातून शहरात जाऊन शिक्षण घेऊ शकत असे आणि शहरात विविध प्रकारच्या लहानमोठ्या नोकऱ्या मिळवू शकत असे. ते ग्रामीण कथा-कवितांची, कादंबऱ्यांची निर्मिती करत असत. या व्यक्तींना त्यांच्या बालजीवनात खेड्यातील अनेक अनुभव आलेले असत. शिक्षणाच्या काळातही ते सुट्या पडल्यावर तीन-तीन, चार-चार महिने आपल्या गावी जात असत. मुक्तपणाने जगत असत... त्यातून त्यांना अनेक ग्रामीण अनुभव येत असत. या अनुभवांना ते कल्पकतेची, प्रतिभेची, संवेदनशीलतेची जोड देऊन त्यांचे कथारूप, कादंबरीरूप, कवितारूप करत असत. यातून प्रारंभीचे ग्रामीण साहित्य निर्माण झाले.

पण या वर्गाच्या ग्रामजीवनातील अनुभवांना मर्यादा पडलेल्या होत्या. कारण ग्रामीण जीवनातील सर्वसाधारण अनुभवच त्यांना माहीत असत. हा वर्ग स्वत: शेती कसत नसे. स्वत:ची शेती कुणब्यांना फाळ्याने, बटईने किंवा खंडाने कसायला देत असे. अधूनमधून सुगीसराई आली की ऊस, हुरडा खाण्यास, हरभरा खाण्यास शेतावर जात असे. कधी आंबे, पेरू, रामफळे, सीताफळे खाण्यास किंवा ती घरी आणण्यास शेतावर जात असे. या पलीकडचे शेतीचे अनुभव किंवा तेथील कुणब्यांचे, कष्टकऱ्यांचे अनुभव त्यांना माहीत नसत किंवा ऐकून माहीत असत... त्यामुळे त्यांच्या ग्रामीण साहित्यावर मर्यादा पडलेल्या होत्या. ग्रामीण साहित्याची १९६०पर्यंत सर्वसाधारणपणे अशी स्थिती होती. त्या ग्रामीण साहित्याचे प्रतिनिधी म्हणून प्रामुख्याने श्री. व्यंकटेश माडगूळकर, श्री. शंकर पाटील, प्रा. द. मा. मिरासदार, ॲड. शंकरराव खरात, श्री. वि. शं. पारगावकर यांचा उल्लेख करावा लागेल.

(१०) १९६० नंतर मात्र नव्या ग्रामीण पिढीचे तरुण लेखक हळूहळू साहित्य निर्मिती करू लागले. त्यात आनंद यादव, श्री. रा. रं. बोराडे, श्री. चंद्रकुमार नलगे, श्री. उद्धव शेळके, श्री. महादेव मोरे यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. हे लेखक स्वत: ग्रामीण जीवनातील कष्टकरी कुटुंबातील होते. त्यांचे सगळे घरदार स्वत: शेतावर किंवा घरीदारी काबाडकष्ट करणारे होते. त्यांनी तेथील दारिद्र्याचा, उपासमारीचा, काबाडकष्टाचा, उपेक्षेचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेला होता. त्यामुळे त्यांच्या कथा-कादंबऱ्यांतून सर्वसामान्यांच्या ग्रामीण जीवनाचे खडतर कष्ट आणि अनुभव व्यक्त होत होते आणि तसे ते व्यक्त होणेही स्वाभाविक होते.

या पिढीतील साहित्यिकांनी ग्रामीण कथा, कविता, कादंबरी, समीक्षा इत्यादी विविध क्षेत्रांत लेखन करून ग्रामीण साहित्याला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. पुढे साहित्य चळवळीमुळे ग्रामीण विभागांत अनेक छोटीमोठी संमेलने भरू लागली. शिवाय शिबिरे, चर्चासत्रे घेऊन ग्रामीण समाजातील तरुण पिढीवर विविध अंगांनी साहित्यविषयक संस्कार केले. जागोजागी विविध संस्था स्थापन केल्या आणि त्यांनी नंतरच्या काळात ग्रामीण साहित्य प्रवाहाला स्थैर्य प्राप्त करून दिले. आज घडीलाही हे साहित्य भरघोस प्रमाणात निर्माण होताना दिसते.

(११) १९७०च्या आसपास दलित साहित्याची चळवळ सुरू झाली आणि मराठी साहित्याला एक नवे परिमाण मिळाले. जनवादी साहित्य, स्त्रीवादी साहित्य, ख्रिस्ती साहित्य, आदिवासी साहित्य इत्यादी विविध सामाजिक घटकातील साहित्य निर्माण होऊ लागले. त्यांची लहानमोठी नियतकालिके, अनियतकालिके निर्माण होऊ लागली. मात्र ग्रामीण आणि दलित साहित्याला जे सातत्य होते ते सातत्य इतर साहित्य प्रवाहांना अनेक कारणांनी नंतरच्या काळात राहू शकले नाही. याचा अर्थ असा नव्हे, की ते साहित्यच निर्माण होऊ शकत नाही. ते निर्माण होते, पण त्यांची लक्षवेधी धारा जाणवत नाही. त्याचीही अनेक कारणे आहेत, एवढेच इथे तूर्त नोंदवावेसे वाटते.

ग्रामीण विभागात निरनिराळ्या ठिकाणी छोटी-छोटी अनेक साहित्यसंमेलने भरत असतात. ही स्वागतार्ह घटना आहे. त्यामुळे त्या त्या परिसरातील साहित्यिकांना त्यात सहभागी होता येते. ते आपल्या पिढीसाठी विचार मांडू शकतात. त्यांच्या साहित्याचा परिचय तेथील तरुण पिढीला होतो. त्या परिसरातीलच सामाजिक, सांस्कृतिक स्थितिगतीशी त्यांचा संबंध असल्याने त्यांना ते आपले वाटते. त्या साहित्याची आणि समाजस्थितीची अनेक अंगेउपांगे प्रकाशात

येतात आणि त्यामुळे इतर साहित्यिकांना ती अधिक परिचित होतात. त्यांना पुन्हा त्यातून साहित्याच्या निर्मितीची अधिकाधिक प्रेरणा मिळते.

१९८० पूर्वी एकूणच मराठी साहित्यक्षेत्रात निर्माण होणाऱ्या नागरी (शहरी) साहित्याची विविध अंगोपांगांनी मीमांसा करणारी अनेक नियतकालिके निघत. ती तर बंद झालीच; पण तशी नियतकालिके विखुरलेल्या खेड्यापाड्यातील समाजात निर्माण होणे शक्य नव्हते. कारण एकतर आर्थिक दृष्ट्या ग्रामीण समाज दुबळा असतो. शिवाय तो शहरांसारखा एका जागी नसतो. त्यामुळे छोट्या छोट्या संमेलनातूनच एकत्र येऊन साहित्याविषयीची विविध अंगी चर्चा होणे शक्य व आवश्यक असते. अशी चर्चा होणे, नितान्त गरजेचे आहे. याचे भान या छोट्या छोट्या संमेलनांनी जाणीवपूर्वक ठेवले पाहिजे आणि जपले पाहिजे. कारण अलीकडे या संमेलनांना जत्रेचे स्वरूप येते आहे की काय, अशी भीती मला वाटते. त्यात केवळ मनोरंजनाचे कार्यक्रम आणि जल्लोष होतानाच विशेष प्रमाणात जाणवते. त्यामुळे एकतर वाङ्मयीन संस्कृतीची नीटपणे जोपासना होत नाही; किंवा ती उथळ स्वरूप धारण करताना दिसते.

(१२) पूर्वी ग्रामीण समाजात तुरळक साहित्य होते; पण अलीकडे त्यांची पिढी तयार झालेली दिसते. ती स्वागतार्ह घटना आहे. या पिढीने विचारपूर्वक आणि गांभीर्याने साहित्याची उपासना आणि जोपासना तसेच निर्मिती आणि समीक्षा गंभीरपणे, अभ्यासपूर्वक करण्याची गरज आहे. केवळ हौसे-मौजेने कोणतीही कलानिर्मिती होऊ शकत नाही. ती एक व्रतभावनेने केलेली उपासना असते, हे तरुण ग्रामीण साहित्यिकांनी जाणीवपूर्वक मनात रुजविण्याची आणि तिचे पोषण करण्याची गरज आहे.

वास्तविक नियतकालिकांची, विविध ग्रंथप्रकाशनाची त्यासाठी नितान्त गरज असते. पण आर्थिक दृष्ट्या दुबळ्या असलेल्या ग्रामीण विभागात आज तरी ते शक्य नाही, असे दिसते. म्हणून छोटी-छोटी संमेलनेच त्याची माध्यमे मानून, त्यातून वाङ्मयीन चर्चा, चिकित्सा होण्याची आवश्यकता आहे. ही संमेलनेच तूर्त तरी वाङ्मयीन चर्चेची, चिकित्सेची आणि त्यांच्या प्रसाराची साधने मानली पाहिजेत.

(अ) याबाबतीत शहरी विभागांतील ग्रंथप्रकाशकांनी या ग्रामीण विभागातील वाङ्मयीन संक्रमणाच्या अवस्थेत आपली भूमिका ओळखून त्यांना खूप काही करता येईल, असे वाटते. विशेषत: ग्रामीण तरुण साहित्यिकांचे ‘साहित्य’ संस्करण करून छापले आणि प्रसिद्ध केले तर त्यांना नवशिक्षित ग्रामीण तरुणवर्ग ग्राहक म्हणून उपलब्ध होऊ शकेल. शहरात आज मराठी ललित साहित्याचा वाचकवर्ग कमी-कमी होत चालला आहे. कारण तो प्रामुख्याने इंग्रजी भाषेत शिक्षण घेऊन जागतिक पातळीवर नोकऱ्या करू लागला आहे. म्हणून तेथील प्रकाशकांनी आणि ग्रंथविक्रेत्यांनीही ग्रामीण विभागातील या नव्या ग्राहकवर्गाकडे वळावे. तेथील साहित्यप्रेमींना ग्रंथालये स्थापन करण्यास मदत केली आणि ती त्यांनी स्थापन केली तर त्यांना कायमचा नवा वाचकवर्ग मिळू शकेल; तसेच तेथील संस्कृतीलाही नवे परिमाण मिळू शकेल, असे मला वाटते.

(ब) नव्या पिढीच्या ग्रामीण साहित्यिकांनीही केवळ हातात पडेल तेच आणि तेवढेच साहित्य वाचण्यापेक्षा आपल्या वाचनाला ‘वाचन संस्कृती’चे स्वरूप प्राप्त करून दिले पाहिजे. साहित्यिकाची वाचनसंस्कृती म्हणजे नुसते इतरांचे साहित्य वाचून काढणे नव्हे. आपणास जर चांगला साहित्यिक व्हायचे असेल तर त्याने समाज नीटपणे समजून घेण्यासाठी ‘ग्रामीण समाजशास्त्र’ वाचावे,

त्याचप्रमाणे सामाजिक मानसशास्त्र, व्यक्तीचे मानसशास्त्र, भारतीय संस्कृती, मूळ मानवधर्म, देशीविदेशी भाषांतील उत्कृष्ट साहित्य इत्यादी नीटपणे वाचले पाहिजे. ते वाचले तरच आपल्या हातून चांगली साहित्यनिर्मिती होऊ शकते. पर्यायाने ग्रामीण समाजाला साहित्यसंस्कृतीचे नवे परिमाण लाभू शकेल.

(क) ही संस्कृती निर्माण करण्यासाठी नव्या, तरुण ग्रामीण साहित्यिकांचा जसा हातभार लागेल; तसाच ग्रामीण समाजातील शिक्षकांचाही हातभार लागू शकेल असे मला वाटते. शहारातील शिक्षकांपेक्षा ग्रामीण विभागातील शिक्षकांवर वेगळी आणि फार मोठी नैतिक आणि सांस्कृतिक जबाबदारी येऊन पडते. प्राथमिक शाळांपासून ते महाविद्यालयांतील सर्वच अध्यापक-प्राध्यापकांना मी शिक्षकच मानतो. ग्रामीण भागातील बहुजन समाज हा शेतकरी, कष्टकरी, कामकरी आणि प्रामुख्याने निरक्षर असतो. त्याची अनेक प्रकारची कामे ही शारीरिक श्रमाशी जोडलेली असतात. अशा अडाणी कुटुंबातील मुलांना शिकविण्याची आणि घडविण्याची जबाबदारी शिक्षकाचीच असते. त्या दृष्टीने ग्रामीण विभागातील शिक्षक हा नव्या पिढीचा पालक आणि पिता दोन्ही असतो. कारण तो सर्वार्थाने नव्या पिढीला घडवीत असतो. माणुसकीचे मूलभूत संस्कार तो नव्या पिढीवर करत असतो. नीतीचे धडे देत असतो. जीवनातील उदात्त मूल्यांविषयी तरुण पिढीत श्रद्धा निर्माण करण्याचे त्याचेच कार्य असते. त्यामुळे नव्या पिढीला नुसते शिकविण्याचे नव्हे; तर घडविण्याचेही काम त्याला करावे लागते. त्यासाठी चांगली चांगली पुस्तके शाळेच्या ग्रंथालयातून मिळवून ती वाचण्याची शिफारस तो करत असतो... त्यामुळेच खऱ्या अर्थाने नवी पिढी घडत असते. उदाहरणार्थ, मी शेतमजुराचा मुलगा होतो. घरात शिक्षणाचा कुणालाही गंध नाही. योगायोगानं मला लहानपणी शाळेत घालण्यात आलं. त्या वेळी शिक्षकांनी माझ्यातील सुप्त गुण ओळखून मला अनेक पुस्तके वाचायला दिली. त्याविषयी माझ्यावर अनेक संस्कार केले. ते इतके मला नवे आणि आवडणारे होते की मलाही शिक्षण पूर्ण करून आपणही शिक्षकच व्हावे, असे वाटले आणि मी शिक्षक आणि साहित्यिक झालो... शिक्षकांच्या मार्गदर्शनाखालीच मला साहित्याचे आणि साहित्यनिर्मितीचे धडे मिळाले. आज मोठ्या प्रमाणात ग्रामीण विभागातील नवी पिढी साहित्यिक होते आहे, होऊ पाहात आहे. हे ओळखूनच ग्रामीण शिक्षकांनी त्यांना आरंभापासूनच जाणीवपूर्वक घडविण्याचा प्रयत्न केला तर ग्रामीण समाजाला उत्कृष्ट साहित्याचे नवे परिमाण लाभेल. ग्रामीण विभागातील महाविद्यालयीन पातळीवर मराठी भाषेच्या प्राध्यापकांवर आणखी एक सांस्कृतिक कार्याची जबाबदारी येऊन पडते. आज सर्वत्रच दूरदर्शनचा विपरीत परिणाम झालेला दिसून येतो. अभ्यास सोडून विद्यार्थिवर्ग दूरदर्शनसमोर सतत बसलेला दिसून येतो. त्यामुळे त्याचे अभ्यासाच्या वाचनाकडे तर दुर्लक्ष होतेच आहे; पण पूर्वी निवांतवेळी ललित साहित्याचे जे वाचन केले जात होते, तेही बंद पडल्याचे जाणवते. एवढेच नव्हे; तर आज सर्वत्रच तरुण पिढीची वाचन-संस्कृती संपुष्टात आलेली दिसते; किंवा भराभर वाचन करून ती त्यातून चटकन मोकळी होतात.

अभ्यास करताना किंवा ललित साहित्य वाचताना त्यांना वाचन-संस्कृतीचा गंधही नसतो. त्यांचे वाचन त्यांच्या मनाला भिडू शकत नाही. त्यामुळे ‘वाचन संस्कृती’ म्हणजे काय, ते त्यांना समजून देण्याची गरज निर्माण होते.

(ड) विशेषत: ललित साहित्याचे वाचन हे वर्तमानपत्राच्या वाचनासारखे वरवरचे करता येत नाही. त्यासाठी 'वाचन-संस्कृती' हा शब्दप्रयोग त्या संदर्भात समजून घेतला पाहिजे. कारण ललित साहित्यात वाच्यार्थाइतकाच त्याचा लक्ष्यार्थ आणि ध्वन्यार्थही समजून घ्यावा लागतो. तो समजून घेण्यासाठी विशिष्ट वाक्याच्या मागेपुढे असलेल्या दुसऱ्या वाक्यांचे संदर्भ आणि बारकावे ध्यानात ठेवावे लागतात. तरच मधल्या वाक्यातील सूचक अर्थ कळू शकतो. ललित साहित्यातील विविध प्रकारच्या अर्थाबरोबर ही वाक्ये भावना, संवेदनाही सूचित करत असतात. त्यासाठी उपमादी अलंकारांची नाजूक शब्दांत योजना करीत असतात. अलंकारांमुळे वेगळ्या कल्पनेच्या सुंदर विश्वात नेतात. त्यामुळे वाचक चकित होतो, शहारून जातो, भारावतो, वासनेपेक्षा निखळ भावनांच्या विश्वात रमतो, वाचताना भोवताल आणि त्याचे वास्तव विसरतो, पात्रांच्या विविध भावना, राग, लोभ, प्रेम, लळा, जिव्हाळा यांच्या आविष्कारामुळे स्वत:ही त्या स्वतंत्र विश्वात रमून जातो. त्यातील विविध पात्रे म्हणजे माणसे यांच्याशी एकरूप होतो. त्यामुळे माणसांचे विविध नमुने त्याला जाणवू लागतात. म्हणून त्याच विश्वात तो रमून जातो. सारांश ललित साहित्याच्या वाचनामुळे माणसाचा विवेक, विचार, चिंतन, भावनाशीलता, संवेदनशीलता, मानवी मनाचे विविध अंगांनी आकलन त्याला होते आणि एकूणच वाचकाचे मानवी जीवन सर्वांगांनी समृद्ध होत जाते. तो जीवनाच्या उदात्त, समृद्ध पातळीवर जगू लागतो. त्यातून मिळणारा सात्त्विक आनंद मनमुरादपणे मिळवू लागतो... हे सर्व ललित साहित्याच्या मन:पूर्वक केलेल्या आणि अनुभवलेल्या वाचन संस्कृतीचेच संस्कार असतात. म्हणूनच माणसाने आपली वाचनसंस्कृती जोपासली पाहिजे, वाढविली पाहिजे. तरच त्याला जीवनातील अत्युच्च पातळीवरचा सात्त्विक आनंद अनुभवता येतो. हे ओळखून महाविद्यालयातील मराठी भाषेच्या प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांवर मराठी वाचन संस्कृतीचे संस्कार करण्याची गरज आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व अंतर्बाह्य पालटून जाते, हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

तरुण ग्रामीण साहित्यिकांनी किंबहुना सर्वच तरुण साहित्यिकांनीही आणखी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. ती अशी की ललित साहित्य ही एक महत्त्वाची जीवनदर्शी कला आहे. तिचे माध्यम भाषा हेच असल्याने ती त्या त्या भाषिक समाजाशी तात्काळ जोडली जाते. सगळा भाषिक समाजच तिचा रसिक-वाचक बनतो. त्यामुळे साहित्यकला ही इतर कोणत्याही कलेपेक्षा अधिक प्रमाणात समाजमनाशी अधिक निगडित असावी लागते. तिच्यातील सामाजिक आशय व्यापक, मार्मिक आणि मनोवेधक असाच असावा लागतो. पण तो तेवढाच ठेवून भागत नाही; म्हणजे असे की साहित्याने फक्त व्यापक समाजदर्शन घडवून भागत नाही; तर ते समाजदर्शन सौंदर्यपूर्णतेने, कलात्मकतेने घडविणे अपरिहार्य असते. कारण कोणतीही कला ही आविष्कारासाठी सुंदरतेचा अंगभूत स्वीकार केल्याशिवाय आकारालाच येऊ शकत नाही. म्हणून नव ग्रामीण साहित्यिकांनी सौंदर्यशास्त्राचाही किंवा कलास्वरूप शास्त्राचाही अभ्यास करण्याची आणि त्याचा आपल्या साहित्यकृतीतून आविष्कार करण्याची नितान्त गरज असते. तरच साहित्याची कलाकृती आकाराला येते. तसे झाले नाही तर ते लेखन केवळ हकिकत सांगणारे, वर्तमानपत्री रिपोर्टासारखे वाटेल. म्हणून तरुण ग्रामीण साहित्यिकांनी साहित्यकलेची उपासना अभ्यासपूर्वक करण्याची गरज आहे. खरेतर जातिवंत साहित्यिक एवढ्यावरच थांबत नाही. जन्मभर तो साधक अवस्थेतच असतो. प्रौढ वयात तो 'तत्त्वज्ञ साहित्यिक' (फिलॉसॉफर रायटर) बनण्याचा प्रयत्न करत असतो. त्यासाठी मानवी जीवनाशी संबंधित देशोदेशीची महत्त्वाची तत्त्वज्ञाने अभ्यासत

राहतो. महान तत्त्वज्ञ साहित्यिकाच्या महान साहित्यकृती अभ्यासतो.

जागतिक पातळीवर आपले साहित्य कसे जाईल याचा त्याला ध्यास लागलेला असतो. त्या योग्यतेचे साहित्य निर्माण करून ते जागतिक पातळीवरील इंग्रजी भाषेत स्वत:च अनुवादित करण्याचा प्रयत्न करतो. त्याचे हे प्रयत्न सखोल अभ्यासपूर्वक इतर ग्रंथ वाचल्यावरच चाललेले असतात, हे लक्षात ठेवावे. मराठीतील उत्कृष्ट साहित्याची इंग्रजीतील भाषांतरे जागतिक पातळीवर जाण्यासाठी केवळ साहित्यिकांनीच नव्हेत तर मोठमोठ्या विचारवंतांनी, साहित्यप्रेमींनी, प्रकाशकांनी, अनुवादकांनी त्यासाठी खास प्रयत्न करण्याची नितांत गरज आहे. त्याशिवाय मराठी साहित्याला जागतिक पातळीवरील प्रतिष्ठा प्राप्त होऊ शकणार नाही, म्हणून भाषांतराचे कार्य जाणीवपूर्वक चालू ठेवले पाहिजे, असे मला वाटते. असो.

ग्रामीण तरुण पिढीचे आजचे ग्रामीण साहित्य हे ग्रामीण समाजवास्तवाच्या चित्रणाच्या दृष्टीने समृद्ध असले तरी त्यातील जे समाजचित्रण आहे ते सामाजिक दृष्ट्या विदारक स्वरूपाचे आहे. माझ्यासारख्या सुशिक्षित, संवेदनशील नागरिकाला त्यातील समाजवास्तव अस्वस्थ करणारे आहे. आजच्या ग्रामीण समाजातील सर्वसामान्य माणूस म्हणजे बारा बलुतेदार, शेतमजूर, सामान्य कष्टकरी वर्ग, दलित, आदिवासी, भटके, इतर मागासवर्गीय यांचे शोषण या समाजात चमत्कारिकपणाने चालले आहे. म्हणजे असे की, परंपरागत चालत असलेले यांचे धंदे सुधारणांच्या नावाखाली बुडाले आहेत. त्यामुळे हा सर्वसामान्यांचा ग्रामीण समाज, शहरी उद्योजक, कारखानदार, निरनिराळ्या शेतीसंबंधित वस्तूंची शहरात निर्मिती करून विक्री करणारे व्यापारी यांच्याकडून श्रमाच्या माध्यमातून लुबाडला आणि पिळला जातो आहे. शेती सुधारणेच्या नावाखाली शहरी उद्योजकांनी तयार केलेली यांत्रिक अवजारे शेतीवर आली, पाणी उपसणारी इंजिने आली, विजेवर चालणारे पंप आले, डिझेलवर चालणारे ट्रॅक्टर आले, गुळापेक्षा साखरनिर्मितीकडे म्हणजे साखर कारखान्यांकडे कारखानदार उद्योजकांकडे ऊस चालला, देशी खतापेक्षा कारखान्यात तयार होणारी रासायनिक खते आली, देशी पायताण-चपलांपेक्षा बाटा-टाटाच्या चपला, बूट वापरण्याची फॅशन आली. या सर्वांमुळे ग्रामीण विभागातील परंपरागत धंदे बुडाले आणि शेतीसंबंधित परंपरागत साधने कालबाह्य ठरली. त्यामुळे ग्रामीण समाजातील सर्वसामान्य शेतकरी, मजूर, कष्टकरी आणि सर्व बारा बलुतेदार वर्ग बेकार आणि कंगाल झाला... ग्रामीण समाजाचे शोषण सुरू झाले. शेतकरी आत्महत्या करू लागले. अशी भयाण स्थिती ग्रामीण समाजात निर्माण झाली. पश्चिम महाराष्ट्रातील ग्रामीण समाजाचा काहीसा अपवाद सोडला तर उर्वरित ग्रामीण महाराष्ट्रात कमीअधिक प्रमाणात हीच समाजस्थिती निर्माण झालेली दिसते. आपला भारत प्रामुख्याने कृषिसंस्कृतिप्रधान देश आहे. अशा ह्या भारतात महाराष्ट्र हे अग्रेसर राज्य म्हणून ओळखले जाते. याचा व्यापक अर्थ असा होतो, की कमीअधिक प्रमाणात सर्वच राज्यात अशीच सामाजिक स्थिती असण्याची दाट शक्यता आहे.

(१४) ग्रामीण समाजाची महाराष्ट्रातील अशी स्थिती असली तरी आणि ग्रामीण समाजातील तरुण साहित्यिक त्याचे पोटतिडकीने समाजदर्शन आपल्या साहित्यातून घडवीत असले तरी महाराष्ट्राच्या शहरी विभागातील विचारवंत व्यक्ती, वाचकवर्ग आणि समाजसुधारक त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करीत आहेत. कारण शहरातील समाजसुधारकांनाही यांचा बिलकूल पत्ता नाही. सगळे शहरी विचारवंत, वाचकवर्ग आपल्या केवळ शहरी समाजसुधारणा, बातम्या, त्यांचे विवेचन आणि वाचन करण्यातच पूर्णपणे गुंतलेले दिसतात. शहरातील प्रकाशक आणि ग्रंथालयेही शहरी

साहित्यापुरतीच जागृत असतात. ग्रामीण समाजाची ही भीषण शोकांतिका आहे. चरितार्थासाठी नाइलाजाने शहरात राहणारा एक ग्रामीण साहित्यिक या नात्याने मला असे वाटते की, सर्व शहरी महाराष्ट्राच्या पोटापाण्याची अखंडपणे तरतूद करणाऱ्या, त्यासाठी प्राणांची बाजी लावणाऱ्या या ग्रामीण समाजाकडे निदान आता तरी लक्ष द्यावे आणि या दारुण अवस्थेतील ग्रामीण समाजाला आता तरी सुस्थितीत आणण्याचा प्रयत्न करावा. त्यासाठी त्याच्या गतानुगतिक, पारंपरिक जीवनसरणीतून त्याला मुक्त करण्याचा प्रयत्न करावा. शहरातील विविध समाजसुधारणावादी संस्थांनी, शासकीय सुधारणांनी, स्वयंसेवी संस्थांनी, सुधारकांनी, विचारवंत मंडळींनी इकडे मनापासून वळावे आणि आपला वेळ आणि धन या ग्रामीण समाजासाठी द्यावे आणि त्याचे मूलगामी परिवर्तन घडवून आणावे. ते हे कार्य मनापासून अनेक वर्षे, दीर्घ काळ करीत राहिले तर महाराष्ट्राच्या स्वातंत्र्योत्तर काळातील ही एक युगप्रवर्तक क्रांती ठरू शकेल आणि समग्र मराठी जीवनाचे सार्थक होऊन त्याला एक नवी कळा आणि कांती प्राप्त होईल... देववाद, अंधश्रद्धा, गतानुगतिक वृत्ती यांतून ग्रामीण समाज पूर्ण मुक्त होईल आणि मराठी समाज सर्वार्थांनी समपातळीवर येईल आणि एकमेकांशी समरस आणि एकरूप होईल आणि भारतासमोर एक नवा मूलगामी आदर्श निर्माण होईल. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज यांचे मूलभूत स्वप्न खऱ्या अर्थाने परिपूर्ण होईल. 'खेड्याकडे चला' म्हणणाऱ्या राष्ट्रपिता गांधींच्या मनाला खरीखुरी शांतता मिळू शकेल. एवढेच नव्हे; तर आपली समाजवादाची स्वप्ने खऱ्या अर्थांनी प्रत्यक्षात उतरलेली दिसतील.

* * *